(A High Impact Factor, Quarterly, Peer Reviewed, Referred & Indexed Journal)

NAVJYOT /Vol. XII / Issue – I ISSN 2277-8063

# महात्मा गांधीजीच्या विचारांचा साहित्यावर प्रभाव

**श्री.जयसिंग बाबुराव दिंडे,** संशोधक विध्यार्थी , मराठी विभाग , शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

---

**प्रस्तावना :**

स्वांतत्र्य चळवळीतभारतीय समाजव्यवस्थेचाविचार करता तळागाळातील व्यक्तीत, व्यक्तिसमूहात नवजागृती आली. यावेळी ग्रामीण समाज, दलितसमाज, आदिवासी समाज, स्त्रीवर्ग इत्यादी वर्ग गांधीजींच्या विचाराशी समरस होऊ लागले होते. गांधीजींच्या स्वातंत्र्य लढ्यात पुरुषांच्या बरोबरीने स्त्रियाही सहभागी करून घेतल्याने भारतातील ग्रामीण,आदिवासी, दलित, स्त्रीवर्ग मोठ्या प्रमाणात सहभागी झाला. या पद्धतीने गांधीजींच्या आंदोलने,चळवळी, मोर्चे, उपोषण इत्यादींतून नवनवीन विचार समाज मनापर्यंत पोहचू लागले. त्यातूनमराठी साहित्यातील गांधी चळवळीत सहभागी असणाऱ्या कार्यकर्त्यांनी लेखन करण्याससुरुवात केली. गांधीजींच्या विचारांचा प्रसार हा सशक्त भारतीय समाजासाठी गरजेचा आहे याभावनेतून लेखन सुरु झाले. तसेच गांधीजींच्या अनुयायांनी गांधीवाद आपल्या भाषणातून, कृतीतून, साहित्यातूनजनमानसांसमोर आणला. गांधीजींच्या अनुयायांमध्ये आचार्य विनोबा भावे, आचार्य शं. द. जावडेकर, आचार्य स. ज.भागवत, आचार्य काका कालेलकर, साने गुरुजी, ग. प्र. प्रधान, एस. एम. जोशी, आप्पासाहेबपटवर्धन, ना. ग. गोरे इत्यादी अनेक अनुयायी गांधीजींच्या कार्याचा प्रभाव पडलेला आहे.

**महात्मा गांधीजीच्या विचारांचा साहित्यावर प्रभाव**

म. गांधीजींच्या स्वातंत्रय चळवळीत अनेक कार्यकर्ते भारतीय स्वातंत्र्यासाठी भारावलेलेहोते आणि त्यातील अनेकजण त्यांचे अनुयायी झाले होते. त्यामुळे अशा अनुयायांतील काहीसाहित्यिक लोकही होते. अशा साहित्यिकांवर गांधीजींच्या कार्याचा, विचारांचा प्रभाव पडलाहोता. त्यामध्ये आचार्य विनोबा भावे, आचार्य शं. ट. जावडेकर, आचार्य स.ज. भागवत, सानेगुरुजी, बाबा आमटे, काका कालेलकर, प्रेमा कटक, अच्युतराव पटवर्धन, ना. ग. गोरे, एस.एम. जोशी, ग. प्र. प्रधान, रा. वि. परूळेकर इत्यादी अनुयायांच्या मराठी साहित्यावरगांधीवादाचा प्रभाव पडला आहे.

१. विनोबा भावे गांधीजींच्या विचाराचे सच्चे पाईक होते. त्यांनी आपल्या ग्रंथांच्यामाध्यमातून आपले विचार मांडले आहेत. ‘‘विनोबांचे इतिहास विचार' या ग्रंथामध्ये विनोबांच्याविचारसरणीची ओळख होते. विनोबांनी ग्रंथाच्या माध्यमातून जी मते मांडली आहेत त्यावर म.गांधीजींच्या विचारांचा प्रभाव दिसून येतो.

२.आदर्श शासन व्यवस्थेचे विवेचन गांधींच्या काही तत्त्वांच्या अनुषंगाने जावडेकरांनीकेलेले आहे. महात्मा गांधीजींच्या सत्य, अहिंसा, न्याय, स्वातंत्र्य समता इत्यादी गोष्टींचाऊहापोह शं. द. जावडेकरांनी केला आहे.महात्मा गांधीजींच्या सत्य, अहिंसा, अस्तेय, स्वदेश संकल्पना, आध्यात्मिक नैतिकताअशा विचारांची बैठक त्यांच्या व्यक्तित्वावर दिसून येते. ‘‘पुरोगामी साहित्य' या ग्रंथामध्येविविध विषयांचा ऊहापोह वैचारिक भूमिकेतून केला आहे. लोकशाही शासन पद्धती म्हणजे काय? लोकशाहीचे विस्तृत विवेचन शं. द. जावडेकरयांनी या ग्रंथात केला आहे. म. गांधीजींच्या सत्य, अहिंसा, अपरिग्रह व्रत इत्यादीचा प्रभाव याग्रंथामध्ये पहावयास मिळतो.

३.महात्मा गांधीजींच्या वेगवेगळया चळवळी, आंदोलने, इतर कार्यक्रमांतून लोक सहभागीहोऊन गांधीजींना सहकार्य करत होते. स्वातंत्र्याच्या लढ्याबरोबर समाजकार्य करत होते.भारतीय समाजव्यवस्था बदलणे हे फार मोठे आव्हान होते. स्वातंत्र्याबरोबर भारतीय मानवीविचार बदलणे तितकेच महत्त्वाचे होते. यातील आचार्य स. ज. भागवत हेही एक अनुयायीहोत. त्यांनी आपल्या साहित्यातून विचार मांडले आहेत. तसेच स. ज. भागवत यांनी प्रस्तुत ग्रंथातून जीवन आणि शिक्षण विषयक विचार सांगून तत्कालीन परिस्थितीला अनुसरून व्यक्त केले आहेत.

४.आप्पासाहेब पटवर्धनांचा 'सेवाधर्म' हा ग्रथ म्हणजे नैतिक शिक्षण, देशसेवा,विश्वबंधुता इत्यादी विचारांची खाणच आहे. आपल्या सेवाधर्म या ग्रंथातून आप्पासाहेबपटवर्धनांनी अनेक विषयातून गांधी विचार मांडले आहेत. आप्पासाहेब पटवर्धनांनी प्रस्तुत ग्रंथात 'सेवाधर्म' या शीर्षकामध्ये सेवा का करावीतसेच सेवेचे अनेक प्रकार आहेत याचा उल्लेख केला आहे. त्यामध्ये समाजसेवा, ज्ञानसेवा,हरिजनसेवा, आदिवासीसेवा, दलितसेवा, मजुरसेवा, ग्रामसेवा, महारोगीसेवा, गोसेवा इत्यादी.यामध्ये पुष्कळशी सेवा हौसेखातर, कौतुकाखातर, मिरवण्यासाठी, प्रसिद्धीसाठी, जिज्ञासेसाठी,अनुकरण म्हणून, मोठेपणासाठी अशा प्रकारे सेवा करत असतात. बऱ्याचवेळा सेवाप्रलोभनामुळे घडते. सहज प्रवृत्तीतून घडते, कळकळीने व जाणीवशून्य वृत्तीन घडत असते हेहीमान्य केले पाहिजे.

५.ग. प्र. प्रधान हे गांधीजींचे कृतिशील अनुयायी होते. गांधीजींप्रमाणे सात्विक जीवनजगून गांधीविचार व्याख्यानातून, आंदोलनातून व विविध कार्यक्रमांच्या अनुषंगाने ते समाजातपोहचवत होते. आपल्या ग्रंथातून गांधींचा अहिंसा विचार, सात्त्विक वृत्ती, नैतिकता, चारित्र्यसंवर्धन इत्यादी मूल्यांचा ऊहापोह आपल्या ग्रथातून केला आहे.

६.थोर समाजवादी विचावंत, साहित्यिक श्री एस. एम. जोशी गांधी विचाराचे अनुयायीहोते. त्यांच्या साहित्यावर गांधीवादाचा प्रभाव स्पष्टपणे पहावयास मिळतो. महात्मा गांधीजींचेकार्यकर्ते हे स्वातंत्र्याच्या संग्रामासाठी लोकांना सहभागी करण्यासाठी सभा, संमेलन, चर्चा,भेटीगाठी अशा माध्यमातून फिरत होते. या गांधीजींचा स्वदेशी नारा व खादीचा प्रसारही सुरूहोता. स्वदेशी नारा व खादीचा प्रसार या विचारांचा प्रभाव एस. एम. जोशीच्या व्यक्तित्वावरपडला होता त्याचा उर्मी या ग्रंथातून केला आहे.

७.विद्यार्थी दशेपासूनच साने गुरुजी राजकीय, सामाजिक, शैक्षणिक, धार्मिक इत्यादीक्षेत्रामध्ये कार्य करत होते. नोकरी करत असताना इ. स. १९३० मध्ये महात्मा गांधीजींनीकायदेभंगाची चळवळ सुरू केली. तेव्हा त्यांनी आपल्या नोकरीचा राजीनामा देऊनदेशकार्यामध्ये उडी घेतली. कायदेभंगाच्या चळवळीतील सहभागामुळे त्यांना दोन वर्षाचीकारावासाची शिक्षा झाली. तुरुगात विनोबा भावे यांचा सहवास त्यांना लाभला. आचार्यविनोबा भार्वेच्या सहवासाने साने गुरुजी साहित्य लेखनाकडे वळले. त्यातूनच त्यांनी ''गीताप्रवचने' या नावाने पुस्तक प्रसिद्ध केले. त्यांनी अनेक ग्रंथांचे लेखन केले. यामध्ये गोड निंबध,क्रांती, आपण सारे भाऊ इत्यादी ग्रंथातून गांधी विचार मांडले आहेत.

८.म. गांधीजींच्या अनेक आंदोलने, मोर्चा अशा विविध कार्यक्रमात क्रियाशील कार्यकर्तेम्हणून ना. ग. गोरे कार्य करत होते. त्यातील १९३० मधील म. गांधीजींच्या दांडीयात्रेमध्ये तेसहभागी होते. दांडीयात्रेमध्ये गांधीजी दांडीयात्रेतेन कूच करत असताना त्यावेळी गांधीजींचाआवेश पाहून ना. ग. गोरे थक्क झाले होते. गांधीजींच्या यात्रेतील त्यांच्या चेहऱ्यावरील भावचलोकांना बरंच काही सांगून जात होता. गांधीजींच्या त्या तेजस्वी रूपाकडे पाहून लोक त्यांचेसेवक होण्यासाठी पुढे येत असत. त्यांच्या त्या व्यक्तिमत्त्वाचा परिणाम जनसामान्य भारतीयचनव्हे तर जगभरातील लोकांच्यावर पडत होता. गांधीजींचे विचार व त्यांचे व्यक्तिमत्त्व याचा ना.ग. गोरे यांच्या मनावर प्रभाव पडला आहे.

अशा प्रकारे भारतातील राजकारणात कार्यकर्ते म्हणून गांधीजींच्याबरोबर कार्यरत असणारे अनुयायी गांधींच्या समाजकार्याने प्रभावित झाले. यावेळी ते गांधींचे अनुयायी प्रथमत: कार्यकर्ते होते नंतर अनुयायी झाले व त्यानंतर साहित्याचेलेखन करू लागले. या अनुयायांच्यावर गांधींचा प्रभाव पडला. गांधीजींच्या अनुयायी साहित्यातून राजकीय, सामाजिक विषय समाजापर्यंतपोहोचवण्याचा प्रयत्न केला व जनजागृती केली. गांधीजींचा सामाजिक जीवनविषयक दृष्टिकोनम्हणजे सर्वसामान्यांचे कल्याण, दलित आणि पददलितांची उन्नती, नैतिकता, प्रामाणिकपणा,निर्भयता, देशासाठी सर्वस्वाचा त्याग तसेच समाजाला स्वातंत्र्य चळवळ व सामाजिक परिवर्तनयाविषयी अनुयायी साहित्यातून माहिती देतात. यामध्ये प्रामुख्याने आचार्य विनोबा भावे ते ग. प्र. प्रधानपर्यंत सर्व अनुयायी मराठी साहित्यात मोलाची भर घातली आहे.

संदर्भ :

१.संपादक वास्कर आनंद , 'वाडमय प्रकार संकल्पना व स्वरूप ', अन्वय प्रकाशन, पुणे,२००४

२.पुंडे दत्तात्रय , 'गांधीवाड आणि आधुनिक मराठी साहित्य', प्रतिमा प्रकाशन, पुणे,१९९५

३.जगताप अनंतराव , 'इथे मराठीचिये नगरी' गम्धिजी, उषा ज्योती प्रकाशन, औरंगाबाद, १९७०

४.चव्हाण एस.एस., 'गांधीवादाचा मराठी साहित्यावरील प्रभाव', पीएच.डी. अप्रकाशित शोधप्रबंध, सावित्रीबाई फुले पुणे विधीपीठ, पुणे२०२१